# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

फोन क्रं :- (०२२)२४०२०७८१
२४०१०४३७
फॅक्स क्रं :- (०२२)२४०२३५१६
२४०२४०६८

कल्पतरु पॉईंट, ३रा माळा,
सिनेमॅक्स सिनेमासमोर,
सायन सर्कलजवळ,
सायन (पु), मुंबई - ४०००२२

जा.क्र. मप्रनि/ समुस कक्ष/ ब- १३०६ दि. १०/०४/२०१५

प्रति,

सर्व प्रादेशिक/उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

विषय : उद्योगांवर/प्रकल्प धारकांवर कायदेशिर कार्यवाही करण्याकरीता विहित नमुन्यामध्ये प्रस्ताव सादर करण्याबाबत.

संदर्भ : मंडळाचे पत्र क्र.BO/TB/MS/B-669, Dt.14/02/2014.

उप प्रादेशिक अधिकारी/प्रादेशिक अधिकारी यांचेकडून उद्योगांविरुध्द/प्रकल्प धारकांविरुध्द कारवाई करण्याकरीता मुख्यालयात प्रस्ताव सादर केले जातात. परंतु माझ्या असे निदर्शनास आले आहे की, प्रादेशिक स्तरावरुन सादर करण्यात आलेले प्रस्ताव मंडळाने ठरवून दिलेल्या नमुन्यामध्ये आवश्यकत्या माहितीसह वरील संदर्भामध्ये नमुद केल्याप्रमाणे संबंधीत विभागाकडे सादर केले जात नाहीत. कांही प्रस्ताव तर केवळ एका पानाची कार्यालयीन टिप्पणी पाठवून केले जातात. तसेच उद्योगांना भेटी दिल्यानंतर दिड ते दोन महिन्यानंतर मुख्यालयात अशा प्रकारे अपूर्ण माहितीसह प्रस्ताव पाठविल्यामुळे सदर उद्योगावर वेळेत योग्य ती कार्यवही करणे शक्य होत नाही.

तरी आपणास परत ताकीत देण्यात येते की, मुख्यालयात कारखान्यांविरुध्द/प्रकल्पाविरुध्द कारवाई करण्याकरीता प्रस्ताव सादर करतांना विहित नमुन्यामध्ये आवश्यकती कागदपत्रे, अहवाल, पृथ्थ:करण अहवाल इ.सह संबंधीत विभागास संदर्भांकित पत्रान्वये सादर करावे जेणे करुन सदर प्रस्तावावर मुख्यालय स्तरावर त्वरीत कार्यवाही करणे शक्य होईल. या परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा संबंधीतावर कडक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(डॉ. पी. अन्बलगन, भा.प्र.से.)
सदस्य सचिव

प्रत : विभाग प्रमुख यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीकरीता.

विभाग प्रमुखांकडे असे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्वरीत कार्यवाही करुन प्रकरणे निकालात काढावीत.

प्रति,

१. प्रादेशिकअधिकारी-मुंबई/ठाणे/कल्याण/रायगड/नवीमुंबई/
पूणे/नशिक/नागपूर/औरंगाबाद/कोल्हापूर/अमरावती/चंद्रपूर

२. उप-प्रादेशिक अधिकारी, मुंबई-1/मुंबई-2/मुंबई-3/मुंबई-4/ठाणे-1/ठाणे-2/
तारापूर-1/तारापूर-2/नवी मुंबई-1/नवी मुंबई-2/तळोजा/कल्याण-1/
कल्याण-2/कल्याण-3/भिवंडी/रायगड-1/रायगड-२/महाड/
कोल्हापूर/सांगली/रत्नागिरी/चिपळूण/पूणे-1/पूणे-2/
पिंपरी-चिंचवड/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/जालना/नांदेड/नाशिक/अहमदनगर/
जळगाव/धुळे/नागपूर-1/नागपूर-2/भंडारा/चंद्रपूर/अमरावती-1/अमरावती-2/
अकोला/परभणी/लातूर